# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट दिनांक २५/०६/२०२२

# कोंबींग ऑपरेशन दरम्यान दोन सराईत, फरार आरोपींना अटक

### (वाकड पोलीस ठाणे तपास पथकाची कारवाई)

--- ०० ---

दिनांक २५/०५/२०२२ रोजी ००:०० ते ०२:०० वा. चे दरम्यान मा. पोलीस उप आयुक्त सो, गुन्हे, पिंपरी चिंचवड यांचे आदेशाने आयुक्तालय हद्दीमध्ये कोंबींग ऑपरेशन राबविण्याचे आदेश होते. त्याप्रमाणे श्री. सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. रामचंद्र घाडगे, पोलीस निरीक्षक, गुन्हे, श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील अधिकारी सपोनि. संतोष पाटील, सपोनि. संभाजी जाधव व पोलीस अंमलदार यांना प्रभावी कोंबीग ऑपरेशन राबविण्याबाबत सुचित करण्यात आले.

कोंबींग दरम्यान, अभिलेखावरील सराईत गुन्हेगार तसेच संशयित व्यक्ती, वाहने यांची तपासणी करीत असताना, दिनांक २५/०६/२०२२ रोजी ०१/४० वा. चे सुमारास, सपोनि. संतोष पाटील व अंमलदार यांना पंडीत पेट्रोलपंप समोर, डांगे चौक रोड, वाकड, पुणे येथे एका मोटार सायकल वरून तीन इसम गडबडीने जाताना दिसले. तेव्हा त्यांनी त्यांचा पाठलाग करत असताना तीन इसमांपैकी एक इसम मोटार सायकल वरुन उडी मारुन अंधाराचा फायदा घेवुन तेथुन पळुन गेला. उर्वरीत दोघांना ताब्यात घेतले, तेव्हा त्यांचेकडे सखोल विचारणा केली असता, त्यांनी त्यांचे नावे **१) शरद बन्सी मलाव, वय २१ वर्षे, रा. काची आली, महालक्ष्मी मिदिराचे मागे, शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे २) आशुतोष मिलींद काळे, वय २२ वर्षे, रा. साई नगर, पाटील भाऊ वखार जवळ, शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे** असे सांगितले. त्यांचेपैकी पळुन गेलेला इसम कोण होता याबाबत विचारपुस केली असता सदरचा इसम हा इम्रान रा. चिंचवड असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे विचारणा करता, ते उडवाउडवीची उत्तरे देवु लागले. त्यांची हालचाली संशयित वाटल्याने सदर इसमांची अंगझडती घेतली असता त्यांचेकडे **एक लांब लोखंडी तलवार** मिळुन आली. सदर इसमांबाबत अधिक माहिती प्राप्त करण्यासाठी अभिलेखाची माहिती घेता सदरचे इसम हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. सदर इसमांवर वाकड पोलीस ठाणे, गु.र.नं. ५४४/२०२२, भाहका. कलम ४, २५ सह कलम ३७ (१), १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पळुन गेलेल्या इसमाबाबत अधिक तपास करता सदर इसमाचे नाव **इम्रान रहिम शेख, वय २२ वर्षे, रा. वेताळनगर झोपडपट्टी, चिंचवड, पुणे** असे असल्याचे व सदर इसम हा सराईत गुन्हेगार असुन त्यास चिंचवड पोलीस स्टेशनकडुन **तडीपार** करण्यात आले आहे.

पकडण्यात आलेल्या दोन आरोपींकडे अधिक तपास करता त्यांनी दिनांक २१/०६/२०२२ रोजी शिरुर पोलीस ठाणे हद्दीत इसम नामे वैभव नितीन भोईनल्लू, वय २२ वर्षे, रा. शिरुर, पुणे यास जिवे ठार मारण्याच्या इराद्याने कोयत्याने वार करुन गंभीर जखमी करुन फरार असलेबाबत निष्पन्न झाले आहे. त्याबाबत **शिरुर पोलीस ठाणे येथे गु.न.नं. ४४७/२०२२, भादंवि कलम ३०७,१०९,५०४,३४ प्रमाणे गुन्हा दाखल आहे**. शिरुर पोलीस ठाणे, पुणे ग्रामिण यांना आरोपीत अटक केलेबाबत माहिती देण्यात आली आहे.

अटक आरोपी यांचेवर दाखल गुन्ह्यांची यादी खालिलप्रमाणे.

**आरोपी शरद बन्सी मल्लाव याचेवर दाखल गुन्हे**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | अधिनियम व कलम |
|---|---|---|---|
| १. | हडपसर, पुणे शहर | १४३९/२०२० | भादंवि कलम ३, ७, ८(२५) |
| २. | रांजणगाव पो.स्टे. | २२९/२०१८ | भादंवि कलम ३९४, ३४ |
| ३. | शिरुर पोलीस ठाणे | ४४७/२०२२ | भादंवि कलम ३०७,१०९,५०४,३४. |

**आरोपी आशितोष मिलिंद काळे याचेवर दाखल गुन्हे**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं. | अधिनियम व कलम |
|---|---|---|---|
| १. | शिरुर पोलीस ठाणे | ४४७/२०२२ | भादंवि कलम ३०७,१०९,५०४,३४. |
| २. | शिरुर पोलीस ठाणे | ८१५/२०१९ | भादंवि कलम ३०७,३२६,३२४,३२३,३४. |
| ३. | शिरुर पोलीस ठाणे | ६५१/२०१७ | भादंवि कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६, ३४. |
| ४. | शिरुर पोलीस ठाणे | ६०१/२०१७ | भादंवि कलम ३८०,४११, ३४. |
| ५. | शिरुर पोलीस ठाणे | ६९८/२०१८ | भारतीय हत्त्यार कायदा कलम ४,२५ |

सदरची कारवाई मा. श्री. अंकुश शिंदे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिंदे सो. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड, मा. श्री. आनंद भोईटे सो, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. पद्माकर घनवट सो. सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे २/ अति.कार्य. वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वाकड पोलीस ठाणे, श्री. रामचंद्र घाडगे, श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि. संतोष पाटील, सपोनि. संभाजी जाधव, पोलीस अंमलदार बिभीषण कन्हेरकर, बाबाजान इनामदार, राजेंद्र काळे, वंदु गिरे, दिपक साबळे, अतिश जाधव, प्रमोद कदम, विक्रांत चव्हाण, अतिक शेख, प्रशांत गिलबीले, तात्यासाहेब शिंदे, अजय फल्ले यांनी मिळुन केली आहे.

**(आनंद भोईटे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ २, पिंपरी चिंचवड